क्लस्टर विकास कार्यक्रम अंतर्गत येथे केळी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजन.
स्थळ- निर्यात सुविधा केंद्र सावदा ता.रावेर जि. जळगाव दिनांक – २३/९/२०१५



केळी प्रशिक्षण कार्यक्रमा दरम्यान कार्यक्रमात नाव नोंदणी करताना महिला वर्ग



केळी प्रशिक्षण कार्यक्रचे दिपप्रज्वलन करताना मा.नजिमुद्दीन शेख, प्रमुख उदयान, विदयावेत्ता,केळी संशोधन केंद्र, जळगाव समवेत ईतर मान्यवर मंडळी.



प्रशिक्षण सत्राचे सुत्रसंचालन करताना फलोत्पादन विकास अधिकारी, जितेंद्र शिंदे



प्रशिक्षण कार्यक्रम सत्रात केळी क्लस्टर विकास कार्यक्रम संकल्पना, पार्श्वभुमी बाबत मार्गदर्शन करताना फलोत्पादन विकास अधिकारी , सचिन माने



निर्यात सुविधा केंद्र सावदा ता.रावेर जि. जळगाव येथे निर्यातक्षम केळी लागवड तंत्रज्ञान, काढणीपुर्व व काढणीपश्चात तंत्रज्ञान बाबत मार्गदर्शन करताना मा.नजिमुद्दीन शेख, प्रमुख उदयान, विदयावेत्ता, केळी संशोधन केंद्र, जळगाव व उपस्थीत शेतकरी व महिला वर्ग्



निर्यात सुविधा केंद्र सावदा ता.रावेर जि. जळगाव येथे केळी प्रशिक्षण कार्यक्रमात एकात्मीक किड व रोग व्यवस्थापन विषयी मार्गदर्सन करताना मा. सुरेश परदेशी, पिक संरक्षण तज्ञ, केळी संशोधन केंद्र, जळगाव समवेत उपस्थीत शेतकरी व महिला वर्ग्



केळी प्रक्रीया व विविध उत्पादने बाबत केळी प्रक्रीया युनीट जळगाव येथील तज्ञ मा. श्री. अशोक गडे



प्रशिक्षण सत्रात कृषि विभागाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करताना मा. संभाजी ठाकुर, प्रकल्प  संचालक , आत्मा, जळगाव

संपन्न प्रशिक्षण कार्यक्रम बातमी

**उत्पादकता | पाडळसा येथे मॉडर्न मार्केट, कोल्ड स्टोरेज उभारणी**

# राज्यात केळी पिकवणाऱ्या जिल्ह्यांमध्ये क्लस्टर समूह

## जिल्हा पणन व्यवस्थापक जितेंद्र शिंदे यांनी दिली माहिती

प्रतिनिधी | सावदा

महाराष्ट्रातील केळी पिकवणाऱ्या जळगाव, नांदेड, कोल्हापूर, सोलापूर व पुणे या जिल्ह्यांमध्ये क्लस्टर समूह उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. जळगाव जिल्ह्यात पाडळसा आणि शिरपूर (जि.धुळे) येथे मॉडर्न मार्केट उभारून कोल्ड स्टोरेज, पॅकिंग हाऊसची उभारणी होईल, अशी माहिती जिल्हा पणन व्यवस्थापक जितेंद्र शिंदे यांनी दिली. सावद्यातील कोल्ड स्टोरेजच्या सभागृहात बुधवारी झालेल्या कार्यशाळेत ते बोलत होते.

पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा, पणन व कृषी विभाग आणि रावेर बाजार समितीच्या माध्यमातून आयोजित कार्यशाळेचा हेतू निर्यातक्षम केळी उत्पादन आणि निर्यातवृद्धी हा आहे. त्यानुसार सहभागी शेतकऱ्यांना उच्च प्रतीची केळी कशी पिकवावी? त्यासाठी कोणती उपाययोजना करावी? विविध रोगांपासून केळीचा कसा बचाव करावा? निर्यात कशी करावी? याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यशाळेत पुणे येथील कृषी पणन मंडळाचे फलोत्पादन विकास अधिकारी सचिन माने, जळगाव येथील केळी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ निझामुद्दीन शेख, तज्ज्ञ सुरेश परदेशी, केळी प्रक्रिया उत्पादनचे अशोक गडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व्ही. एस. सोनवणे आदींनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. महाबनानाचे अध्यक्ष ज्ञानदेव महाजन अध्यक्षस्थानी, तर प्रमुख पाहुणे म्हणून आत्माचे प्रकल्प संचालक संभाजी ठाकूर, पंचायत समिती सदस्य गोपाल नेमाडे, कैलास सरोदे, ए. टी. झांबरे, राजीव पाटील, हेमंत अत्तरदे, सचिन पाटील, उपस्थित होते.

### तंत्रज्ञानावर भर

कार्यशाळेत शेतकऱ्यांना निर्यातक्षम केळी पीक लागवड, उत्पादनवाढ तंत्रज्ञान, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, काढणीपूर्व आणि काढणी पश्चात तंत्रज्ञान, केळी प्रक्रिया व उत्पादने, कृषी विभाग व आत्मा योजना आदींबाबत प्रशिक्षण देण्यात आले. केळी पोखरणारी अळी, खोड पोखरणारी अळी, मावा, फुल किडे, पाने पोखरणारी अळी, पर्णगुच्छ, करपा, आदी रोग व किडींपासून केळीचे संरक्षण कसे करावे? निर्यातक्षम केळीची गुणवत्ता कशी असावी, ही माहिती देण्यात आली. या कार्यशाळेला केळी उत्पादकांसह केळी वर आधारित प्रक्रिया उद्योग चालवणारेही उपस्थित होते.